जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा

-: निवीदा / दरपत्रक सूचना :-

दिनांक १८/०६/२०२५

जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा या कार्यालयातील कागदी कातरन (विस्ट पेपरची रद्दी) तसेच संगणक विभागातील कागदी खरडे/खोके विकावयाची आहे. करीता ज्या लोकांना कागदी कातरन (रद्दी) तसेच कागदी खरडे/खोके एकत्रित विकत घ्यावयाची असेल त्यांनी आपली निविदा/दरपत्रक या कार्यालयास दिनांक २७/०६/२०२५ चे सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावी. त्यानंतर कोणतीही निविदा स्विकारण्यात येणार नाही.

कागदी कातरन (रद्दी) व कागदी खरडे/खोके विकत घ्यावयाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहे

१	जमा असलेली कागदी कातरन (रद्दी) अंदाजे ३०० किलो आहे.
२	जमा असलेल्या कागदी खरडे/खोक्यांचे अंदाजे वजन १०० किलो आहे.
३	कागदी कातरन (रद्दी) तसेच खरडे/खोक्यांची खरेदी एकत्रित करायची असल्यामुळे दोन्ही करीता एकच निविदा सादर करावी. परंतु निविदेमध्ये कागदी कातरन (रद्दीचा) तसेच खरडे खोक्यांचा भाव हा प्रति किलो प्रमाणे स्वतंत्र/वेगवेगळा लिहावा.
४	संपुर्ण मालाची किंमत एकमुस्त दयावी लागेल.
५	खरेदीदार यांनी जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा यांचेकडील रद्दी बारदान्यासह घेतल्यास प्रति बारदाना रुपये २०/- शुल्क अतिरिक्त आकारण्यात येईल.
६	ज्यांना या कार्यालयात रद्दी आणि खरडे खोके खरेदीकरीता निविदा/दरपत्रक सादर करावयाच्या असतील अनामत रक्कम १०,०००/-(अक्षरी रुपये दहा हजार फक्त) स्वतः जमा करावे लागतील. त्याशिवाय कोणतीही निविदा/दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.
७	ज्यांची निविदा/दरपत्रक मंजुर होईल त्यांनी कागदी कातरन (रद्दी) व खरडे खोके मोजुन घेण्याकरीता तराजु, वजन काटा व सर्व माल भरण्याकरीता पोत्याची व्यवस्था करुन तो माल येथुन नेण्याची व्यवस्था करावी.
८	निविदा/दरपत्रक मंजुर झाल्याचे कळल्यापासुन माल ३ दिवसांचे आंत किंवा वाढविलेल्या /दिलेल्या मुदतीच्या आंत उचलुन न्यावा लागेल. तसे न केल्यास नविन निविदा/दरपत्रक पुन्हा बोलविण्यात येईल व माल विकल्या जाईल.
९	असे करतांना सरकारला जे काही नुकसान होईल ते प्रथम ज्यांची निविदा/दरपत्रक मंजुर झाली होती व ज्याने माल उचलुन नेला नाही, त्यांची अमानत रक्कम सरकारला जमा(फॉरफिटेड) करण्यात येईल व झालेल्या नुकसानाची रक्कम त्यांचेकडुन वसुल करण्यात येईल.
१०	कोणतीही निविदा/दरपत्रक कारण न दाखविता नामंजुर करण्याचा / विक्री प्रक्रीया स्थगीत किंवा रद्द करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वर्धा यांना राहिल.

स्वा/-

(संजय जु. भारूका)

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,

वर्धा.

पृष्ठांकन क्र. २७०२/रो.व.वि.वि./२०२५
दिनांक : १८/०६/२०२५.

प्रतिलिपी माहिती व कार्यवाहीकरीता :-

१) जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
२) जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
३) तहसिल कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
४) जिल्हा परीषद कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
५) सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
६) सहाय्यक अधिक्षक, संगणक विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा यांना सदरची प्रत जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा चे संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता.

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
वर्धा.